SPECIAL OFFERS
ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW
www.abhibee.com

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : ०५३ ● पुणे ● सोमवार, दि. ०६ जानेवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



सभागृहात अवतरल्या शेकडो सावित्रीबाई! 3



'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम 4

## ठळक बातम्या

### 'एचएमपीव्ही'चा एकही रुग्ण नाही!

**पुणे : (आरंभ पर्व)** चीनमध्ये सध्या मानवी मेटान्यूमोव्हायरसचा (एचएमपीव्ही) उद्रेक सुरु आहे. राज्यात अद्याप या विषाणूचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही, असे आरोग्य विभागाने रविवारी स्पष्ट केले. दरम्यान, एचएमपीव्हीबाबत दक्षतेसह सर्दी-खोकल्याच्या रुग्णांच्या सर्वेक्षणाचे पाऊल आरोग्य विभागाने उचलले आहे. आरोग्य विभागाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर म्हणाले, 'मानवी मेटान्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) श्वसन संसर्गास कारणीभूत ठरतो. हा विषाणू पहिल्यांदा नेदरलँडसमध्ये 2001 मध्ये आढळला. हा एक सामान्य श्वसन विषाणू असून, तो श्वसनमार्गाच्या वरील भागातील संसर्गास कारणीभूत ठरतो. हा एक हंगामी साथरोग आहे आणि फ्ल्यूप्रमाणेच हिवाळा आणि उन्हाळ्याच्या सुरुवातीला उद्‌भवतो. राज्यात आतापर्यंत एचएमपीव्हीचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही.'

### कारवाईचा बडगा


**पुणे : (आरंभ पर्व)** संक्रातीतील पतंगबाजीसाठी वापरल्या जाणाऱ्या नायलॉन मांजामुळे नागरिक, तसेच पक्ष्यांना गंभीर दुखापत होण्याच्या घटना घडल्या आहेत. नायलॉन मांजा विक्रीवर बंदी असताना छुप्या पद्धतीने मांजा विक्री करणाऱ्या दोघांना गुन्हे शाखेने पकडले. त्यांच्याकडून नायलॉन मांजाची रिळे जप्त करण्यात आली. बिबवेवाडी आणि धानोरी भागात ही कारवाई करण्यात आली. बिबवेवाडी भागातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठेनगर परिसरात एक जण नायलॉन मांजाची विक्री करत असल्याची माहिती पोलीस शिपाई सुमीत ताकपेरे यांना मिळाली.

# 'साप साप म्हणून भूई थोपटणं हे योग्य नाही' : भुजबळ

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी आज मीडियाशी संवाद साधला. सध्या ते पक्षात नाराज आहेत. अलीकडेच त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत एकाच कारमधून प्रवास केला होता. त्यानंतर शरद पवार यांनाही भेटले. यावर आज छगन भुजबळ बोलले. पत्रकारांनी त्यांना विचारलं, देवेंद्र फडणवीस, शरद पवार यांच्या बरोबर भेट झाली, काय चर्चा झाली? त्यावर ते म्हणाले की, "हे खरं आहे, मी मुख्यमंत्री फडणवीस यांना भेटलो होतो. 3 जानेवारी सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिवस होता. त्या निमित्ताने जन्मगावी नायगाव येथे मोठा कार्यक्रम असतो, मुख्यमंत्री आणि सात-आठ मंत्री तिथे होते. काही विकास काम करायची आहेत. त्याबद्दल त्यांनी ताबडतोब कलेक्टर आणि सगळ्यांना जमीन अधिग्रहणाचे आदेश दिले"

"त्याचदिवशी संध्याकाळी चाकणला महात्मा फुले यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचं अनावरण होतं. तिथे शरद पवार साहेब होते.



मला बोलावलं होतं. नायगावला काय आणि चाकणला काय, शरद पवार यांच्यासोबत काय आणि देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत काय... राजकारणावर चर्चा झाली नाही. आमची फक्त महात्मा फुले, सावित्रीबाई फुले या विषयावर चर्चा झाली" असं छगन भुजबळ म्हणाले.

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे, त्यांचा राजीनामा घेऊन तुमचा मंत्रिमंडळात समावेश होणार अशी चर्चा आहे. त्यावर छगन भुजबळ यांनी उत्तर दिलं. "मला मंत्री व्हायचं आहे, म्हणून कोणाचा तरी बळी घ्यावा, राजीनामा घ्यावा आणि मला मंत्री करावं असं माझ्या स्वप्नातही येणार नाही" असं छगन भुजबळ यांनी स्पष्ट केलं.

"मुंडेंचा राजीनामा मागितला जात आहे. मला सांगायचं आहे की फडणवीस यांनी स्पष्ट सांगितलं मी पूर्ण चौकशी करणार. चौकशीत कोण सापडले, आका काय काका काय त्या सर्वांवर कारवाई करू. त्या आधी मुंडेंचा राजीनामा का मागत आहात? चौकशीतून काही आलं का? तुमच्याकडे काही असेल तर पोलिसांकडे द्या. जोपर्यंत चौकशीतून काही येत नाही. तोपर्यंत राजीनामा मागणं चुकीचं आहे. मला हे बरोबर वाटत नाही. साप साप म्हणून भूई थोपटणं हे योग्य नाही" असं छगन भुजबळ म्हणाले.

### 'माझं पद गेलं, डाग लागला'

"मी ही अशा प्रकरणातून गेलो आहे. 2003 मध्ये तेलगीला पकडलं मी, त्याच्यावर मोक्का दाखल केला मी. माझ्यावर आरोप लागल्यावर माझा राजीनामा घेण्यात आला. तेव्हा मी उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री होतो. राज्य आमचं होतं. पण परिस्थिती पाहून मीच सुप्रीम कोर्टात गेलो. सुप्रीम कोर्टाच्या माध्यामातून ही केस सीबीआयला गेली. तेव्हा केंद्रात भाजपचं सरकार होतं. सीबीआयने चौकशी केली. त्यांनी सांगितलं. तुमचा काहीही दोष नाही. माझं नाव चार्जशीटमध्ये नव्हतं. माझं पद गेलं, डाग लागला. मनस्ताप झाला. पण त्यानंतर पवार साहेबांनी मला मंत्री केलं. मी ते भोगलं आहे. कारण नसताना, सिद्ध झालेलं नसताना राजीनामा घेणं योग्य नाही" असं छगन भुजबळ यांनी सांगितलं.

### छगन भुजबळ म्हणाले, परदे में रहने दो...

गेल्या आठवड्यात पुण्याच्या चाकणमध्ये महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याचा अनावरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार हे एकाच मंचावर आले होते. त्यांच्या या भेटीची बरीच चर्चा रंगली. त्याच कार्यक्रमात शेजारी शेजारी बसलेले असताना शरद पवार यांनी भुजबळांना काहीतरी लिहून दिल्याचं दृश्य सर्वांना दिसलं. त्यांच्या या कृतीने सर्वांचच लक्ष वेधलं गेलं होतं. पवारांनी लिहीलेल्या आणि भुजबळांनी वाचलेल्या त्या कागदामध्ये असं काय लिहीलेलं होतं याची सर्वांनाच उत्सुकता होती. आज छगन भुजबळ यांनी माध्यमांशी संवाद साधत अनेक विषयांवर मनमोकळेपणाने भूमिका मांडली. त्यावेळीच त्यांना त्या चिठ्ठीबद्दलही विचारण्यात आले. त्या दिवशी कार्यक्रमात शरद पवार यांनी तुम्हाला चिठ्ठी दिली, त्यात काय होतं असं प्रश्न भुजबळ यांना विचारण्यात आला होता. " त्यावर काय लिहिलं ते सांगू? ते परदे मे रहने दो, पर्दा ना उठाओ " असं म्हणत छगु भुजबळ मनसोक्त हसले आणिा त्यांनी मोठ्या खुबीने तो प्रश्न टोलावून लावला.

# सोसायटीत दूषित पाण्याचा पुरवठा करणारा अटकेत

**पुणे : (दै. आरंभ पर्व)**

खराडीतील न्याती ईलसिया सोसायटीत टँकरव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या टँकर व्यावसायिकाने दूषित पाण्याचा पुरवठा केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. टँकर व्यावसायिकाने महापालिकेच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील (एसटीपी) पाणी सोसायटीला दिल्यानंतर रहिवाशांना उलट्या, जुलाबाचा त्रास झाला. सोसायटीतील नागरिकांनी याबाबत महापालिकेकडे तक्रार दिल्यानंतर ही बाब उघड झाली. याप्रकरणी टँकरने सोसायटीला पाणी पुरवठा करणाऱ्या व्यावसायिकाला चंदननगर पोलिसांनी अटक केली.

याप्रकरणी श्रीराम वॉटर सप्लायर्सचे मालक श्रीनिवास रामलू दासरी (वय 40) याला अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत महापालिकेच्या बंडगार्डन पाणी पुरवठा विभागातील कनिष्ठ अभियंता नितीन जाधव यांनी चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे, अशी माहिती चंदननगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांनी दिली.

खराडीतील न्याती ईलसिया सोसायटीत 850 सदनिका आहेत. या सोसायटीला महापालिकेकडून पाणी पुरवठा केला जातो. मात्र, रहिवाशांची संख्या विचारात घेता पाणी पुरवठा अपुरा पडत असल्याने सोसायटीने श्रीराम वॉटर सप्लायर्सला टँकरव्द्वारे पाणी पुरवठ्याचे काम दिले होते. त्यानुसार सोसायटीला दररोज 30 ते 35 टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो. मात्र, श्रीराम वॉटर सप्लायर्सकडून सोसायटीला महापालिकेच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातून पाणी पुरवठा करण्यात आला. हे पाणी बांधकामसाठी वापरले जाते. मात्र, श्रीराम वॉटर सप्लायर्सने दूषित पाणी पुरवठा केल्याने सोसायटीतील रहिवाशांना उलट्या, जुलाब, पोटदुखी असे त्रास सुरु झाल्याने त्यांनी महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील मुख्य अभियंता नंदकुमार जगताप यांच्याकडे 23 डिसेंबर रोजी तक्रार दिली. त्यानंतर पाणी पुरवठा विभागातील कनिष्ठ अभियंता नितीन जाधव, उपअभियंता अन्वर मुल्ला यांनी सोसायटीला भेट दिली. सोसायटीला टँकरद्वारे होणाऱ्या पाण्याचे नमुने तपासणीसाठी ताब्यात घेतले. श्रीराम वॉटर सप्लायर्सने 7 ऑक्टोबर ते 17 डिसेंबर या कालावधीत न्याती ईलेसिया सोसायटीत टँकरद्वारे प्रक्रिया केलेले सांडपाणी पुरवले. या पाण्याचा वापर रहिवाशांनी पिण्यासाठी केल्याने आरोग्यविषयक त्रास झाला. चौकशीत ही बाब उघड झाल्यानंतर पाणी पुरवठा करणारा पाणी पुरवठा करणारा टँकर व्यावसायिक श्रीनिवास दासरीला अटक करण्यात आली.

Pushpam Beauty Parlor & Institute
PUSHPAM Beauty HAIR SALON
SPECIAL OFFER
40% OFF
Services Offered:
- Blowout
- Hair Cutting
- Hair Colouring
- Makeup Extension
BOOK NOW
+91 95117 17449
ABOVE KOHINOOR MEDICAL, NEAR UMBRYA GANAPATI TEMPLE, DHAYARI, PUNE

# मुंडेंच्या बंगल्यावर खंडणीसाठी बैठक

## भाजप आमदार सुरेश धस यांचा आरोप




राज्यात येणाऱ्या गुंतवणूकदारांकडे खंडणी मागितली जात असेल, तर कोणीही राज्यात येणार नाही. मुख्यमंत्र्यांनी अशा गोष्टींकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे उच्चपदस्थांचे राजीनामे त्वरित घेऊन कडक कारवाई व्हावी. – पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेस नेते

देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याकडे हात जोडून विनंती आहे. त्यांनी मुंडे यांचा राजीनामा घ्यावा. बीडचा बिहार नाही, तर हमास-तालिबान झाला आहे. कराड यांच्या बँक व्यवहाराची चौकशी झाली पाहिजे.- - सुरेश धस, आमदार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या नियोजनाची सुरुवात एप्रिल-मे महिन्यापासूनच झाली होती. पवनचक्की कंपनीकडे खंडणी मागण्यासाठी धनंजय मुंडे यांच्या 'सातपुडा' या सरकारी बंगल्यावर एक बैठक झाली होती. त्यातील 50 लाख रुपयांची रक्कम निवडणुकीपूर्वीच देण्यात आली,' असा आरोप भाजप आमदार सुरेश धस यांनी येथे रविवारी केला. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख आणि परभणी येथील आंबेडकरी चळवळीशी संबंधित युवक सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येच्या पार्श्वभूमीवर या दोघांना न्याय मिळावा, यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. ऐतिहासिक लाल महाल येथून या मोर्चाला सुरुवात होऊन जिल्हाधिकारी कार्यालय येथे मोर्चाचा समारोप झाला. त्या वेळी बोलताना आमदार धस यांनी धनंजय मुंडे यांच्यावर हल्लाबोल केला. 'धनंजय मुंडे काही ब्रह्मदेव नाहीत. नैतिकता आणि मुंडे यांचा काही संबंध नाही. खंडणीसंदर्भातील बैठकीचे आरोप चुकीचे असतील तर, राजकारण सोडून देईन,' असे सांगतानाच धस यांनी महाराष्ट्र अजित पवार यांच्याकडे एका चांगला नेता म्हणून पाहत आहे. त्यामुळे त्यांनी तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणीही केली. संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणी वाल्मीक कराड याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करावा आणि दोषींना फाशीची शिक्षा द्यावी. शिक्षा होत नाही, तोपर्यंत धनंजड मुंडे यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी,' अशी मागणी जनआक्रोश मोर्चामध्ये करण्यात आली. सर्वपक्षीय मोर्चाला युतीआघाडीचे आमदार अनुपस्थित

जनआक्रोश मोर्चाला पुणे शहरातील आमदारांनी पाठ फिरवली. त्यावरून भाजपचे आमदार सुरेश धस यांनी खोचक टिप्पणी केली. 'रविवारची सुट्टी असल्याने ते मोर्चात सहभागी झाले नसावेत' असे त्यांनी सांगितले. संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय, मुलगी वैभवी, बीडचे खासदार बजरंग सोनावणे, शिवसंग्राम संघटनेच्या अध्यक्ष ज्योती मेटे, पुण्याचे माजी महापौर प्रशांत जगताप, शिवसेनेचे (ठाकरे) शहर प्रमुख संजय मोरे या वेळी उपस्थित होते. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी उपस्थित राहून मोर्चाला पाठिंबा दिला.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR
आपला बायोटाडा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com
Call Now ७२७६३१४१४२



# हिमालयात बर्फ न टिकण्याचे नवे संकट

ओम पर्वत, बद्रीनाथ आणि केदारनाथ यांसह मध्य हिमालयाच्या उंच टेकड्यांवर नोव्हेंबरपासून बर्फवृष्टी सुरू होते. यंदा डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात बर्फवृष्टी सुरू झाली आहे; पण उंच टेकड्यांवर हा बर्फ जास्त काळ राहण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे वैज्ञानिक चिंतित असून हिमालयीन प्रदेशासह मोठ्या नद्यांच्या पाणलोट आणि लाभक्षेत्रात जलसंकट निर्माण होण्याची शक्यता आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, ईशान्येचा भाग वगळता उर्वरित हिमालयीन प्रदेशात या वर्षी सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे आणि पाऊस कमी झाला तर बर्फ कमी पडेल. त्याचा हिमालयाशी संबंधित पाच देशांवर व्यापक प्रभाव पडतो. कारण हिमालय हा आशियाचा जल स्तंभ असण्याबरोबरच या खंडाचा हवामान नियंत्रकदेखील आहे. भारतीय हवामान विभागाच्या मते उत्तर आणि उत्तर-पश्चिम भारताच्या बहुतेक भागात पूर्व आणि ईशान्य भारताच्या काही भागांत सामान्यपेक्षा कमी पाऊस पडू शकतो. येत्या काळात दक्षिण भारतातील द्वीपकल्पीय भागात सामान्यपेक्षा 121 टक्के जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. अंदाजानुसार, दक्षिण पॅसिफिक महासागरात तटस्थ ‘अल निनो’ परिस्थिती आहे, तर ‘ला निना’ परिस्थिती आणखी विकसित होऊ शकते. त्यामुळे भारतीय हवामानावर परिणाम होऊ शकतो. कमी पावसामुळे, हिमालयातील उंच शिखरे आणि खोऱ्यांना बर्फाऐवजी हलका पाऊस किंवा कोरड्या हवामानाचा सामना करावा लागू शकतो. तज्ज्ञांच्या मते, हिमालयात कमी पाऊस आणि कमी बर्फवृष्टीची मुख्य कारणे म्हणजे जागतिक हवामानबदल, ‘अल निनो’चा प्रभाव, वातावरणातील दाब आणि मानवी क्रियाकलापांतील बदल. वातावरणातील दाबाच्या नमुन्यातील बदलांमुळे उत्तर-पश्चिमी वारे हिमालयाच्या वरच्या भागात पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे पाऊस आणि बर्फवृष्टी कमी होऊ शकते.

जागतिक हवामानबदलामुळे तापमान वाढत आहे. त्याचा परिणाम बर्फवृष्टीच्या प्रक्रियेवर होतो. उष्णता वाढली की बर्फाऐवजी पाऊस अधिक पडू लागतो. याव्यतिरिक्त, पृथ्वीच्या हवामान चक्रात नैसर्गिक बदल आहेत, जसे की आंतरमॉन्सून आणि मॉन्सून ब्रेक्स. त्यामुळे हिमालयाच्या प्रदेशात कमी पाऊस आणि बर्फवृष्टी होऊ शकते. कमी हिमवर्षाव म्हणजे बर्फ वितळणे. त्याचा थेट परिणाम नद्यांच्या जलपातळीवर होतो. यामुळे पाण्याचे संकट उद्‌भवू शकते. त्याचा परिणाम शेती, पिण्याचे पाणी आणि उद्योगांवर होतो. गंगा, यमुना, सतलज, सिंधू आणि ब्रह्मपुत्रा या ग्लेशियरवर आधारित नद्या भारतीय उपखंडासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कारण या नद्या केवळ पाणीपुरवठ्याचे प्रमुख स्त्रोत नसून शेती, उद्योग, वीजनिर्मिती आणि पिण्याच्या पाण्यामध्येही मोठी भूमिका बजावतात. वाढत्या उष्णतेमुळे मॉन्सूनची दिशा आणि स्वरूप बदलू शकते. त्यामुळे असामान्य पाऊस आणि दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते. हिमालयातील बर्फवृष्टी कमी झाल्यामुळे पाणीपुरवठ्यात घट होऊ शकते. रब्बी आणि खरीप पिकांवर त्याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो. हिमालयीन प्रदेशात स्कीइंग, ट्रेकिंग आणि बर्फावर आधारित इतर पर्यटन



उपक्रम खूप प्रसिद्ध आहेत. बर्फवृष्टी कमी झाल्यामुळे या क्रियाकलापांचे आकर्षण कमी होऊ शकते. त्याचा पर्यटन उद्योगावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. याचा परिणाम स्थानिक रोजगार आणि आर्थिक क्रियाकलापांवर होऊ शकतो. या स्थितीत हिमालयातील हवेचा दाब आणि वायुगतीकीमध्ये बदल होऊ शकतो. यामुळे वायू प्रदूषणाची पातळी वाढून श्वसनाचे आजार आणि आरोग्य समस्या उद्‌भवू शकतात. हिमालयात कमी बर्फवृष्टीमुळे उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र होऊ शकतात. अतिउष्णतेमुळे उष्माघात, निर्जलीकरण आणि इतर आरोग्य समस्या उद्‌भवू शकतात. अशा परिस्थितीत सरकार आणि सामान्य जनतेने कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी अगोदरच तयार राहणे आवश्यक आहे. खास रचनेसाठी ओळखल्या जाणाऱ्या ओम पर्वतावरील बर्फापासून बनवलेला ओमचा आकार काढून टाकण्यात आला. ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात हा बर्फ गायब झाला. शास्त्रज्ञांच्या मते ओम पर्वत भारत, चीन आणि नेपाळच्या सीमेवर स्थित आहे आणि समुद्रसपाटीपासून सुमारे 5900 मीटर उंचीवर आहे. हा पर्वत कैलास मानसरोवर यात्रेतही महत्त्वाचा थांबा आहे. चीनच्या सीमेला लागून असलेल्या लिपुलेखपर्यंतचा रस्ता तयार झाल्यानंतर येथील पर्यटकांची संख्याही वाढली. अल्मोडा येथील ‘सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंटल असेसमेंट अँड क्लायमेट चेंज सेंटर’चे जे. सी. कुनियाल यांच्या म्हणण्यानुसार, जगभरात हंगामी बदल दिसून येत आहे. ओम पर्वतावरही हवामान बदलाचा परिणाम दिसून येत आहे.

जागतिक तापमान वाढत आहे आणि त्याचा सर्वाधिक परिणाम हिमनद्यांवर होत आहे. जंगलाला आग लागण्याच्या घटना आणि त्याची व्याप्ती वाढत आहे, हे विशेष. जंगलातील आगीतून निघणारा काळा कार्बन हिमनद्यांवर परिणाम करतो. हिमनदीच्या चांगल्या आरोग्यासाठी त्याच्या खाली असलेल्या झुडपांमध्ये चांगले गवत असावे. अल्पाइन प्रदेशातील जंगलांचे आरोग्य चांगले असावे. या सगळ्यामुळे तापमान संतुलित राहते. या सगळ्याकडे एकत्रितपणे पाहण्याची गरज आहे. संयुक्त राष्ट्रांनी आधीच इशारा दिला आहे. 2022 च्या संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार, हिमालयातील एक तृतीयांश हिमनद्याला ‘ग्लोबल वार्मिंग’चा धोका आहे. वाढत्या तापमानामुळे 2000 पासून हिमनदी वितळण्याचे प्रमाण वाढले आहे. ग्लेशियर्स दरवर्षी 58 अब्ज टन बर्फ गमावत आहेत. हे फ्रान्स आणि स्पेनच्या एकूण पाण्याच्या वापराच्या बरोबरीचे आहे. ‘द इंटरनॅशनल सेंटर फॉर इंटिग्रेटेड माउंटन डेव्हलपमेंट’च्या मते हिंदुकुश हिमालयीन प्रदेशात तापमान वाढीचा दर जागतिक दरापेक्षा खूप जास्त आहे. 2023-24 च्या हिवाळ्यात संपूर्ण प्रदेशात विक्रमी कमी हिमवृष्टी झाली. विशेषत: पश्चिम हिमालयात फार कमी हिमवर्षाव झाला. 2023 च्या भारतीय हवामान विभागाच्या अहवालानुसार, गेल्या वर्षी मॉन्सूननंतर उत्तराखंडमध्ये ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये तापमानात दोन अंशांपेक्षा जास्त बदल झाला होता. याशिवाय हिवाळ्यानंतर पावसाचे प्रमाण खूपच कमी होते. या वर्षी उत्तराखंडच्या मैदानी आणि डोंगराळ भागात भीषण उष्मा होता. डेहराडूनमध्ये तापमान 44 अंशांवर पोहोचले आहे. ग्लेशियोलॉजिस्ट डॉ. अनिल देशमुख यांच्या मते, देशाच्या इतर भागांच्या तुलनेत हिमालयात तापमान अधिक वेगाने वाढत आहे. याला एलिव्हेटेड इफेक्ट म्हणतात. जसजशी उंची वाढते तसतसे तापमानही वाढते. त्यामुळे, हंगामी बर्फ आता उन्हाळ्यात तसेच हिवाळ्यात आणि वसंत ऋतूमध्ये वेगाने वितळत आहे.

ओम पर्वतावरील बर्फ गायब होणे हा त्याचा पुरावा आहे. गेल्या 30 ते 40 वर्षांच्या मूल्यांकनावरुन असे दिसून येते, की बर्फवृष्टीचे प्रमाण कमी होत आहे आणि पावसाचे प्रमाण वाढत आहे. कमी बर्फ आणि वाढत्या तापमानामुळे हिमनद्या वितळत आहेत. गढवाल विद्यापीठाचे प्राध्यापक आणि हिमनदी शास्त्रज्ञ एचसी नैनवाल यांनी सांगितले, की हवामानातील बदल आणि ‘ग्लोबल वॉर्मिंग’मुळे हिमवर्षाव कमी होत आहे. हिमनद्यांमध्ये बर्फ साचू शकत नाही, हे भविष्यातील जलसंकटाचे लक्षण आहे. हिमालयीन प्रदेश हिमवर्षाव नसलेले दिसतात. नैनवाल म्हणतात की, हिमवर्षाव नसणे ही चिंतेची बाब आहे; परंतु त्याहून धक्कादायक बाब म्हणजे हिमनदीतील रात्रीचे तापमान वाढत आहे. त्यामुळे बर्फवृष्टी झाली तरी बर्फ वेगाने वितळत आहे. ग्लेशियरमध्ये बर्फ गोठत नसेल तर हिमनदीचे वस्तुमान संतुलन ऋणात्मक होते. रात्रीच्या वेळी हिमनदीचे तापमान हवे तितके थंड नसते. नोव्हेंबर ते मार्च या कालावधीत हिमनदीमध्ये सर्वाधिक बर्फ पडतो. मे ते ऑक्टोबर या काळात बर्फ वितळतो. जेव्हा पृथ्वी तापमानवाढीच्या अवस्थेत असते, तेव्हा हिमनद्या मागे सरकतात. म्हणजे त्यांची घनता आणि जाडी कमी होते.

## सावित्रीबाई फुले जयंतीदिनी राष्ट्रसेवा समूहाच्या शिव-दिनदर्शिकेचे ग्रामस्थांच्या हस्ते प्रकाशन

**पुणे : लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी राष्ट्रसेवा समूहाच्या शिव-दिनदर्शिकेचे प्रकाशन ग्रामस्थांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन राजमाता जिजाऊ महिला महासंघाच्या सर्व सदस्य यांच्यामार्फत करण्यात आले.तसेच यावेळी सावित्री वंदना म्हणण्यात आली.

राष्ट्रसेवा समूहाची शिवदिनदर्शिका ही यात महामानवांचे जयंती, पुण्यतिथी दिन,छत्रपती शिवरायांच्या बद्दलची विशेष माहिती व सर्व धार्मिक सणांची माहिती दिली जाते. याचे संपूर्ण भागात मोफत वितरण करण्यात येते.

राष्ट्रसेवा समूह हा गेली 20 वर्षापासून संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक उपक्रमात अग्रेसर आहे. राष्ट्रसेवा समूहाचे संस्थापक अध्यक्ष राहुलभाऊ पोकळे यांच्या कुशल नेतृत्वाखाली राष्ट्र सेवा समूह आपले योगदान देत आहे.

आजच्या शिव दिनदर्शिका प्रकाशनानिम्मित राजमाता जिजाऊ महिला महासंघ अध्यक्षा स्मितातार्ई पोकळे, तसेच महिला महासंघाच्या पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते राष्ट्रसेवा समूह प्रवक्ते नवनाथ रायकर, रणजीत जोरे , अतुल पोकळे, कृष्णा पोकळे,राहुल जाधव, विजय रायकर, दादासाहेब पोकळे, तुषार कुंभार,श्रीकांत पोकळे, सचिन पातूरकर, प्रतिक जोरे, प्रसाद पोकळे, कृष्णा पोकळे, स्वप्निल पातूरकर, संजय गवळी, अँड.बाळासाहेब अंबाड,तानाजी चिकने, शिवराज कौलगे, मारुती हनुमंते,सोनाली पोकळे,ज्योती कुंभार, रुपाली रायकर, भाग्यश्री काळे, प्रिया पातूरकर, निर्मला पोकळे, मीरा पोकळे, भारती पोकळे, राजश्री सांगळे, संगीता जोरे, सुजाता डोळस, अंकिता जाधव, गौरी कुंभार उपस्थित होत्या. यावेळी कार्यक्रमाचे निवेदन व प्रास्ताविक नवनाथ रायकर,रणजीत जोरे ,प्रसाद पोकळे यांनी केले.

*ड्रिम्स युवा फाउंडेशनने आयोजित केलेल्या रक्तदान*

## शिबीरास 993 रक्तदात्यांचा उच्चांकी प्रतिसाद

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**



ड्रिम्स युवा फाउंडेशन संचलित उरुळी कांचन ग्रामस्वच्छता अभियान गुप्रच्या 10 व्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे बी.जी. शिर्के प्राथमिक शाळा उरुळी कांचन या ठिकाणी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रम प्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ.पराग काळकर, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अमृता क्षीरसागर, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक रेश्मा शेख, प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महात्मा गांधी सर्वोदय संघाचे उपाध्यक्ष प्रा. के.डी.कांचन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. याच कार्यक्रमाचे औचित्य साधून रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने मान्यवरांच्या हस्ते सहभागी आणि स्वयंसेवकांना मोफत हेल्मेट वाटप करण्यात आले. त्याचबरोबर पर्यावरण पूरक उपक्रमांची माहिती असलेल्या ड्रिम्स दिनदर्शिकेचे प्रकाशन देखील करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी बोलताना 'देशातील समस्यांवरती उपाययोजना करण्यासाठी युवकांची जागृती आणि सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. ड्रिम्स युवा फाउंडेशन राबवित असलेल्या सर्व उपक्रम आणि त्यामध्ये असलेला युवकांचे सहभाग उल्लेखनीय आहे' असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.पराग काळकर यांनी व्यक्त केले. या शिबिराला सरपंच अमित बाबा कांचन, देविदास भन्साळी, महादेव कांचन, राजाराम कांचन, राजेंद्र कांचन, राजेंद्र टिळेकर, सुरेखा भन्साळी, संतोष कांचन, सुनिल कांचन, सुनिल तांबे, संभाजी कांचन, बजरंग म्हस्के, मंगेश कानकाटे, जयप्रकाश बेदरे, विजय टिळेकर, डॉ शिवाजी बोऱ्हाडे, अशोक मोरे, संतोष कांचन, अलंकार कांचन, शांताराम चौधरी, सोमनाथ शेलार, महंत रविराज पंजाबी, संतोष चौधरी, जेष्ठ पत्रकार सुनिल जगताप, नंदकिशोर बगाडे, महादेव काकडे, शैलेश बाबर, शैलेश गायकवाड, शिवप्रेमी इतिहास अभ्यासक खलिल शेख, ड्रिम्स युवा फाउंडेशन - ग्रामस्वच्छता अभियान गुप्र मधील सर्व सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, उरुळी कांचन मधील सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील सर्वच मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दुसरा जाधवर आंतरशालेय क्रीडा महोत्सव सोमवारपासून




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

- **जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस्, नऱ्हे, पुणे तर्फे आयोजन ; सहा क्रीडाप्रकारांचा सहभाग**

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस्, तर्फे दुसऱ्या जाधवर आंतरशालेय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक 6 ते 11 जानेवारी 2025 दरम्यान मानाजीनगर नऱ्हे येथील डॉ. सुधाकरराव जाधवर शैक्षणिक संकुल - 1 येथे या क्रीडा स्पर्धा होणार आहेत. महोत्सवांतर्गत विजेते खेळाडू व संघांना 80 हजार रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत, अशी माहिती जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस्चे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यांनी पत्रकार परिषदेत दिली. क्रीडा महोत्सवांतर्गत सहा क्रीडा प्रकारांत स्पर्धा होणार आहेत.

इनडोअर मध्ये बुद्धीबळ, टेबल टेनिस आणि तायक्वांदो तसेच आऊटडोअर मध्ये व्हॉलिबॉल, रस्सीखेच, कबड्डी या खेळांच्या स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेत 14 वर्षाखालील आणि 17 वर्षाखालील अशा दोन गटांत स्पर्धकांना सहभागी होता येणार आहे. ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, शालेय अभ्यासाप्रमाणे शारीरिक तंदुरुस्ती देखील तितकीच गरजेची आहे. त्यामुळे संस्थेतर्फे जाधवर करंडक, विविध स्पर्धा, युवा संसद यांसह आंतरशालेय क्रीडा महोत्सवाचे देखील आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पुणे शहर, पिंपरी-चिंचवड व पुणे जिल्ह्यातील स्पर्धक तसेच शाळांचे संघ सहभागी होत आहेत. क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देत आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडावेत, याकरिता अशा महोत्सवांचे आयोजन संस्था सातत्याने करीत आहे.

महोत्सवात सहभागाची अंतिम तारीख 4 जानेवारी असून 8208848244, 9637805143 या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.



## राज्यस्तरीय आदर्श समाज भूषण पुरस्काराने तानाजी कांबळे यांचा सन्मान

*जनसामान्यांचा प्रहार न्यूज व प्रहार जनशक्ती पक्ष कोल्हापूर यांच्यातर्फे पुरस्कार संपन्न*

**पुणे : लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

जनसामान्यांचा प्रहार न्यूज व प्रहार जनशक्ती पक्ष कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 31 /12/ 2024 रोजी शिव भीम महोत्सव 2024 समाज प्रबोधनी हॉल शाहू पुतळा इचलकरंजी या ठिकाणी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या राज्यातील सामाजिक राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे जगातील सर्वात लहान गिर्यारोहक अन्वी घाटगे व पत्रकार अभिनेते दगडू माने, रजनीताई शिंदे ,अध्यक्ष महाराष्ट्र राज्य महिला पोलीस मित्र संघटना राजेंद्र प्रधान यांच्या हस्ते तानाजी कांबळे यांना "आदर्श समाज भूषण" पुरस्काराने गौरविण्यात आले कांबळे यांचे सामाजिक क्षेत्रात योगदान असून कोरोना काळातही त्यांच्याकडून विशेष कामगिरी करण्यात आलेली सतत ते कार्यरत असायचे. अनेकांच्या जीव वाचवण्यास यांच्याकडून मदत झालेली आहे. सामाजिक कार्य क्षेत्रात सतत कार्यरत असतात दिव्यांग वाढीसाठी शासन स्तरावर पाठपुरावा करत असतात .रक्तदान जनजागृती असो व आरोग्य क्षेत्रातील समाजातील नागरिकांचे प्रवाशांचे प्रश्न असून ते नेहमी कार्यरत असतात.

कांबळे हे पुणे महानगर परिवहन महामंडळ पुणे या ठिकाणी वाहक या पदावर काम करत असून त्यांचा त्या क्षेत्रातही विशेष असा कामगिरीचा ठसा उमटवला आहे.

प्रवाशाची उत्कृष्ट सेवा म्हणूनही त्यांना अनेक वेळा पीएमपीएल कडून गौरविण्यात आलेले आहे. अलीकडेच त्यांनी आर्मी रोडवर अपघातग्रस्त पाच लोकांचा जीव वाचवण्यात त्यांना यश आले. स्वतःचा जीव धोक्यात घालून त्यांनी हे यशस्वी योगदान दिलेले आहे आरत्या त्याग आलेला प्रवासी त्यांचाही जीवनात त्यांना यश आले व काम करत असताना प्रवचन उत्कृष्टपणे सेवा देत असतात. विविध सामाजिक उपक्रम नाही तर बस मध्ये काम करत असताना राबवत असतात पीएमपीएल कडून उत्कृष्ट व विशेष कामगिरीबद्दल म्हणून त्यांचा अनेक वेळा गौरव करण्यात आलेला आहे .अशा विविध कामाच्या कार्याची दखल स्वराज्य ग्राहक न्याय संस्था व प्रहार न्यूज यांच्याकडून घेण्यात आली व त्यांचा राज्यस्तरीय आदर्श समाज भूषण या पुरस्काराने सन्मान करण्यात आला .

या कार्यक्रमाचे आयोजन प्रहार न्यूज संपादक विकास गायकवाड व प्रहार जनशक्ती पक्ष यांच्याकडून करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अनेक क्षेत्रातील मान्यवर व सामाजिक कार्यकर्ते इतर संस्थांचे प्रतिनिधी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात



### महिला उपाध्यक्षपदी सुप्रिया करमरकर यांची निवड

**पुणे (आरंभ पर्व) :** भारतीय जनता पार्टी खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या महिला आघाडीच्या उपाध्यक्षपदी सुप्रिया करमरकर यांची नियुक्ती करण्यात आली. भाजपा खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. रश्मी रूपेश घुले पाटील यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी बोलताना सौ रश्मी घुले पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे , आ . भीमरावअण्णा तापकीर यांच्या कुशल नेतृत्वाखाली आगामी काळात खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये जास्तीत जास्त सदस्य जोडण्याचा संकल्प बोलून दाखवला. यावेळी करमरकर यांनी सौ.घुले यांचे उपाध्यक्षपदी निवड केल्याबद्दल आभार मानले. व त्यांच्यासोबत खडकवासला मतदारसंघांमध्ये भाजपाचे संघटन वाढवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी सांगितले.

### सावित्री हे नाव नसून ती एक विचारधारा : प्रा. सुवर्णा चव्हाण

**उरुळी कांचन (आरंभ पर्व) :** सावित्रीबाई फुले या पहिल्या भारतीय महिला शिक्षिका तर होत्याच शिवाय त्या समाजसुधारक, कवयित्री, भारतीय स्त्री मुक्ती चळवळीच्या पहिल्या नेत्या अशा अनेक भूमिका बजावत आयुष्यभर स्त्रियांना नवसंजीवनी देणाऱ्या क्रांतीज्योती ठरल्या. म्हणूनच सावित्री हे नाव नसून ती एक विचारधारा आहे असे प्रतिपादन महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या प्रा. सुवर्णा चव्हाण यांनी केले. येथील महात्मा गांधी सर्वोदय संघ संचलित पद्मश्री मणिभाई देसाई महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती निमित्त स्त्रियांना नवसंजीवनी देणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या विषयावरील व्याख्यानप्रसंगी प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी बोऱ्हाडे होते. यावेळी व्यासपीठावर वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सुजाता गायकवाड, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. शुभांगी रानवडे उपस्थित होत्या. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. स्वागत व प्रास्ताविक कु. साक्षी कोतवाल हिने केले तर आभार कु. सलोनी बडेकर हिने मानले. सूत्रसंचालन स्वाती शिंदे हिने केले. या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. शुभांगी रानवडे व प्रा. सारिका ढोणगे यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रा. कमरुनिसा शेख, प्रा. प्रतीक्षा कोद्रे, प्रा. रेवती आंबेकर यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

### शिवनेरी किल्ल्यावर शैक्षणिक सहल



**उरुळी कांचन (आरंभ पर्व) :** उरुळी कांचन येथील महावीर निवासी मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना गड किल्ल्यांची माहिती व्हावी म्हणून, शैक्षणिक सहल काढण्यासाठी पत्रकारांनी मदत करावी अशी इच्छा या शाळेच्या प्रशासनाने 15 ऑगस्ट 2024 रोजी व्यक्त केली होती. त्यावेळी उपस्थित इतिहास अभ्यासक - शिवभक्त खलिल शेख यांच्या संकल्पनेतुन यांच्या प्रयत्नांनी आणि प्रिंट व डिजिटल मीडिया पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष सुनिल जगताप यांनी आपण सहलीचे नियोजन करा आपणास सहकार्य केले जाईल असे आश्वासन दिले. या दिलेल्या आश्वासनाची पूर्तता काही मान्यवरांच्या सहकार्याने साकार करण्याचा क्षण आज अस्तित्वात आला. शनिवार दि.4 जानेवारी रोजी सकाळी 7 वाजता या सहलीच्या बसला उरुळी कांचन येथील ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ व मारुती मंदिरासमोर श्रीफळ जेष्ठ पत्रकार सुनिल जगताप यांच्या हस्ते वाढवून त्यांनी शुभेच्छा दिल्या. सुमारे 40 मूकबधिर विद्यार्थी, सहा शिक्षक या सफरीस जाऊन आले. शिवनेरी गडावर त्या गडाची ऐतिहासिक माहिती विद्यार्थ्यांना खलिल शेख देत असताना, शिक्षकांनी समन्वयकाची भुमिका बजावली, त्या मुलांच्या चेह-यावरील उत्सुकता, आनंद आणि स्फुर्ती पाहिल्यावर आयोजकांनी केलेल्या प्रयत्नांचे चिज झाल्याची भावना व्यक्तड केली. त्यांनतर किल्ला उतरताच अष्टापुरचे सुपुत्र अन जुन्नरमधे प्रकल्प अधिकारी असणारे सोनुल कोतवाल यांना कळताच त्यांनी सर्वांच्या जेवणाची अत्यंत उत्कृष्ट व्यवस्था केली. शाळेच्या वतीने कोतवाल यांचे आभार मानुन वेळ असल्याने पुढे अष्टविनायकांपैकी लेण्याद्री आणि ओझर या देवस्थानाचे पण दर्शन घडवुन आणले. सहलीची समाप्ती झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेह-यावरील आनंद आणि समाधान पाहुन आयोजक आणि शिक्षकांनी समाधानाची भावना व्यक्त केली.

**जाहीर प्रसिद्धीकरण**

अक्षय रेसिडेन्सी को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, पुणे यांचे ५ शेअर्स प्रमाणपत्र क्रमांक ५ (अनुक्रमांक २१ ते २५), जे श्रीमती मणी गो.चावला यांच्या नावावर होते, ते गहाळ झाले आहेत. या संदर्भात कोणाची कसलीही हरकत असल्यास कृपया १५ दिवसांच्या आत सोसायटीच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. यानंतर हरवलेले प्रमाणपत्र रद्द करून नवीन प्रमाणपत्र देण्यात येईल.

माननीय सेक्रेटरी,
अक्षय को ऑप हौसिंग सोसायटी मर्यादित,
अक्षय रेसिडेन्सी, आनंद नगर, सिंहगड रोड, पुणे ४११०५१
संपर्क- राजेंद्र जगदाळे- ९३५९०२३६१९

# ... अन सभागृहात अवतरल्या शेकडो सावित्रीबाई!

## सावित्री-ज्योतिबाच्या काव्यरचनांनी चार दिवसीय पहिल्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हलचे उद्घाटन



**पुणे: लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

महात्मा फुले, ज्ञानज्योती सावित्रीबाई व फातिमाबी शेख यांच्या वेशभूषेतील कवी-कवयित्रींनी सादर केलेल्या काव्यरचना, फुले दाम्पत्याचा गौरवपूर्ण उल्लेख, विचारांचा जागर, सावित्री-ज्योति यांच्यासह आद्यक्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयघोष करीत पहिल्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हलचे उद्घाटन गुरुवारी झाले.

अंगावर हिरवे इरकल, कपाळी आडवा गंध, हाती पुस्तक, ओठी सावित्री-ज्योतिचा जागर अशा स्वरूपात शेकडो महिला सावित्रीबाईंच्या पेहरावात अवतरल्या! डोक्यावर फुले फेटा, अंगात कोट घालून आयोजक महात्मा फुलेंच्या पेहरावात आल्याने सभागृहात जणू सावित्रीबाई, ज्योतिराव आल्याची भावना उपस्थितांच्या मनात होती.

भिडेवाडाकार कवी विजय वडवेराव यांच्या संकल्पनेतून देशातील मुलींची पहिली शाळा भिडेवाडा आंतरराष्ट्रीय काव्यजागर अभियानांतर्गत पहिला आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हल 2 ते 5 जानेवारी या कालावधीत होत आहे. नवी पेठेतील एस. एम. जोशी फाउंडेशनच्या सभागृहात महाराष्ट्रासह देशविदेशातून 600 कवी, साहित्यिक, विचारवंत, कलाकार यामध्ये सहभागी झाले आहेत.

क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील बुधवार पेठेतील भिडेवाड्यात सुरु केलेल्या देशातील पहिल्या मुलींच्या शाळेचा इतिहास जतन व्हावा, फुले दाम्पत्याच्या कार्यकर्तृत्वाचा प्रचार व प्रसार व्हावा आणि हा इतिहास पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने या फेस्टिवलचे आयोजन केले आहे. देश-विदेशातील सहाशे कवींचा काव्य महोत्सव, भिडेवाडा या विषयावर मराठी गझल मुशायरा, एकपात्री प्रयोग, शालेय विद्यार्थ्यांच्या नाट्यछटा, एकांकिका, सांगितिक पोवाडे, महिला सक्षमीकरणासाठी लाठीकाठी, दांडपट्टा प्रात्यक्षिक असे विविध कार्यक्रम फेस्टिव्हलमध्ये होणार आहेत. लंडन, ऑस्ट्रेलिया, अबुधाबी आदी देशांतून, तसेच केरळ, मध्यप्रदेश, राजस्थान, गुजरात, दिल्ली, तेलंगणा, उत्तरप्रदेश आदी राज्यातून कवी-कवयित्री सहभागी झाले आहेत.

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा त्याग, समर्पण आणि देशाच्या जडणघडणीतील योगदान अमूल्य आहे. फुले दाम्पत्याला भारतरत्न मिळायला हवा. ही एक चळवळ असून, फुले विचार पुढच्या पिढीमध्ये रुजवण्यासाठी प्रयत्न करत आहोत. जिल्हास्तरावर, राज्यस्तरावर फुले दाम्पत्याचा कार्यजागर करणारे कार्यक्रम वर्षभर घेतले जातात. ज्यांनी कर्मठ व्यवस्थेच्या विरोधात जाऊन स्त्री शिक्षणाचा पाया रोवला, लोकांचा शिव्याशाप, चिखलफेक, शेणाचे गोळे अंगावर झेलले, त्याग व समर्पण भावनेने कार्य केले, त्या फुले दाम्पत्याला भारतरत्न पुरस्कार मिळण्यासाठी अभियान राबवणार आहोत, असे वडवेराव म्हणाले.

## जिल्हा परिषदसाठी नारायणगाव येडगाव गटातून अनेक इच्छुक

**खोडद (दै. आरंभ पर्व)**

जुन्नर तालुक्यात विधानसभा निवडणुका उत्साहात पार पडल्या. आता जिल्हा परिषद निडणुका घेण्याच्या हालचालींना वेग आला आहे. त्यामुळे ही निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्यांनी मतदारसंघात संपर्क मोहीम सुरु केली आहे. नारायणगाव -येडगाव या जिल्हा परिषद गटातून अनेक जण इच्छुक आहेत. त्यामध्ये नारायणगावचे लोकनियुक्त माजी सरपंच, विद्यमान उपसरपंच बाबू पाटे, सूरज वाजगे,धनगरवाडीचे सरपंच महेश शेळके, त्यांच्या पत्नी जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका प्रियंका शेळके,सुजित खैरे, विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संचालक संतोषनाना खैरे, यांच्या नावाची चर्चा होत आहे. बाबू पाटे यांनी आपल्या वडिलांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात करून मतदारांशी संपर्क सुरु केला.अपक्ष आमदार शरददादा सोनवणे यांच्याकडुन उमेदवारांची शोधाशोध सुरु असल्याचे समजते.तसेच विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संचालक संतोषनाना खैरे यांनी नारायणगाव -येडगाव जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढविण्याच्या हालचाली सुरु केल्या आहेत.राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुजित खैरे यांच्या नावाची चर्चा आहे. तथापि सूरज वाजगे यांना संधी दिली जाऊ शकते. अशी चर्चा आहे. नारायणगाव -येडगाव जिल्हा परिषद गटामधून मागील निवडणुकीत आशा बुचके या निवडून आल्या होत्या. त्यांनी या मतदारसंघातील नारायणगाव, वारूळवाडी, हिवरे खोडद, येडगाव, आर्वी, गुंजाळवाडी या गावांतील विकासकामे मोठ्या प्रमाणात केली आहेत.

## त्रस्त रहिवाशी यांचे आज मूक आंदोलन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**





भूगाव,जि. पुणे येथील फॉरेस्ट ट्रेल्स टाऊनशिप मध्ये राहणार्या रहिवाशांना विकसकाकडून (परांजपे स्कीम) अशा अचानक पाणी कपात केली जाते आणि वीज पुरवठा ही वारंवार खंडीत होत असतो. गेल्या अनेक वर्षांपासून फॉरेस्ट ट्रेल्समध्ये पाणी बंद होण्याच्या आणि वारंवार वीज खंडित होण्याच्या घटना होत असून टाऊनशिपमधील रहिवाशांना पाणी आणि अखंड वीज पुरवण्याची जबाबदारी टाऊनशिप अधिसूचनांनुसार विकासकाची आहे. येथील रहिवासी या समस्यांनी त्रस्त झाले आहेत. यासंदर्भात वेळोवेळी दाद मागून देखील न्याय मिळत नाही. त्यामुळे त्रस्त रहिवाशी पीएससी हाऊस, केतकर पथ एरंडवणे, पुणे येथे 6 जोनेवारी 2025 रोजी सकाळी 11 वाजता मूक आंदोलन करून आपली व्यथा मांडणार आहेत.

सदर मूक आंदोलनात टाऊनशिपमध्ये राहणारे एस पी शुक्ला (भारत सरकारचे माजी वित्त सचिव), कॅप्टन उदय कुलकर्णी सह डॉक्टर आणि अभियंते, चार्टर्ड अकाउंटंट्स, व्यापारी आणि उद्योजक या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत.

तसेच 1.उदय कुलकर्णी, 2.रूपा कुलकर्णी 3.मीरा कुलकर्णी भोळे 4.अभिजित भोळे 5.नरेंद्र भोळे 6.अजित दिवेकर 7.माधवी दिवेकर 8.विलास डहाणूकर 9.शोभना डहाणूकर 10.निशा सावंत 11.आशिष भोसले सावंत 12.मिलिंद कामत 13.प्रदीप लाखे (अथश्री इ2) 14.राघवेंद्र तोरवी 15.राजश्री तोरवी 16.बसवेज पाटील (आराम) 17.लक्ष्मी पाटील (आराम) 18.वृंदा शुक्ल फडके 19.एस. पी. शुक्ला 20.मच्छिंद्र राठोड (आराम) 21.कल्पना राठोड (आराम) 22.राम पार्थसारथी 23.देवदत्त टेंगशे 24.सुचेता उकिडवे टेंगशे 25.अतुल श्रीधर आगटे 26.अभय श्रीधर आगटे 27. अर्पिता शेजवलकर 28. शिवाजी बोईनवाड (आराम) 29. अनिता बोईनवाड (कम्फर्ट) 30. मधुरा शहाणे 31. दिलीप शहाणे 32. तुषार लखानी 33. प्रतिक्षा लाखनी 34. हीता लखानी 35. अजय भावे 36. अपर्णा भावे 37. आर्या भावे 38. प्रमोद मुलबागल 39. शैलजा मुलबागल 40. अजय पिंगळे 41. मिलिंद बेंबळकर 42. दिलीप कुलकर्णी, 43. डॉ. देवयानी पंडित, 44. विक्रम कुलकर्णी, 45. निखिल कुलकर्णी, 46. अनुजा कुलकर्णी 47. ऋत्विज गंडागुळे 48. प्रमोद गंडागुळे 49. सुलेखा गंडागुळे 50. अमित खोटेले 51. भूमी खोटेले 52. विजय उमराणी 53. मेधा उमराणी 54. सुजाता सहाणे 55. दिलीप पारगावकर 56. डॉ ई डी पाटील 57. रणजित लोखंडे 58. नीला देशमुख 59. संगिता बिर्जे पाटील 60. प्रशांत तिडके 61. रामचंद्र जाधवराव 62. डॉ.ललिता कोल्हटकर 63. बृजू पार्थसारथी 64. विनायक वाळूजकर 65. स्वाती वाळूजकर 66. समीर गुप्ते 67.जे.रमेश 68.मधुरा खाडे सिन्हा 69. खाडे 70.सुरेंद्र गाडगीळ 71. योगेश शिंदे 72. विनय मेस्त्री 73. अमिताभ वैद्य 74. मयूर दाणी 75. सुधा दाणी 76. विनय तिनईकर 77. लता भोळे 78. भाऊसाहेब भोसले सहित सुमारे 100 ते 150 रहिवाश्यांचा समावेश असणार आहे.

## सैफी बुरहानी एक्सपोला सुट्टीच्या दिवशी पुणेकरांचा प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**





दाऊदी बोहरा समाजातर्फे आयोजित सैफी बुरहानी बिझनेस एक्सपो 2025 चे पुण्यातील डेक्कन कॉलेज ग्राऊंड येथे शनिवार 4 जानेवारीला शानदार उद्घाटन संपन्न झाले आणि दुसऱ्या दिवशी म्हणजेच रविवारचा सुट्टीचा दिवस पाहता या एक्सपोला पुणेकरांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी करत प्रतिसाद दिला आहे.

दाऊदी बोहरा समाजाचे सैयदना मुफद्दल सैफुद्दीन साहब यांचे चिरंजीव हुसैन बुऱ्हानुद्दीन यांच्या हस्ते संपन्न झालेल्या या उद्घाटन समारोहाला किर्लोस्कर न्यूमेटिक्सचे चेअरमन राहुल किर्लोस्कर, आयकर आयुक्त डॉ. नितिन वाघमोडे, पुणे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष फत्तेचंद रांका, भाजप व्यापारी आघाडीचे प्रमुख उमेश शाह यांच्यासह मोठ्या संख्येने दाऊदी बोहरा समाजाचे उद्योगपती-व्यावसायिक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विविध प्रकारच्या उद्योग-व्यवसायांना एक-दुसऱ्यांसोबत कनेक्ट करण्याच्या उद्देशाने या बिझनेस एक्स्पोचे आयोजन करण्यात आलेले आहे.

दाऊदी बोहरा समाजाच्या वतीने फत्तेचंद रांका आणि उमेश शाह यांना सन्मानित करण्यात आले. सोमवार 6 पर्यंत चालणाऱ्या या बिझनेस एक्स्पोमध्ये पुणे आणि महाराष्ट्रासह देशभरातील विविध राज्यांमधील तसेच विदेशातून आलेल्या उद्योगपती आणि व्यावसायिकांचे स्टॉल्स लावण्यात आलेले आहेत. यामध्ये एमएसएमईज, स्टार्टअप्स, वुमेन आंत्रप्रेन्योर, रिटेलर्स, रिअल इस्टेट डेव्हलपर्स, सर्व्हिस प्रोव्हायडर, एज्युकेशनल इन्स्टीट्यूट्स, हेल्थकेअर आणि वेलनेस प्रोफेशनल्स यांचे 170 स्टॉल्स आहेत. पुणेकरांनी विविध स्टॉल्सवर जाऊन विविध वस्तूंची माहिती घेतली यामध्ये फर्निचर, हार्डवेअर, गृह सजावटीच्या वस्तूंची खरेदीदेखील केली. एक्स्पोसंदर्भात दाऊदी बोहरा समाजाच्या नागरिकांमध्ये मोठा उत्साह दिसून आला.

## सूर संगत संस्थेच्या वतीने आयोजित सांगीतिक मैफल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सूर संगत संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सांगीतिक मैफिलीने श्रोत्यांना शास्त्रीय संगीताचा एक अद्वितीय अनुभव दिला. विविध रागांचे सादरीकरण आणि वाद्य संगीताच्या सुंदर साथीने रसिक मंत्रमुग्ध झाले. बागेश्री अंगाचा चंद्रकंस आणि शहाणा कानडा या रागांच्या सादरीकरणाने कार्यक्रमाला वेगळा आयाम दिला. सूर संगत संस्थेच्या वतीने धायरी येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अमेय बिच्चू, केदार केळकर यांनी सादरीकरण केले. मैफिलीची सुरुवात अमेय बिच्चू यांच्या एकल संवादिनी वादनाने झाली. त्यांनी तिलक कामोद, श्याम कल्याण, आणि नंद या तीन रागांच्या मिश्रणातून साकारलेल्या रागाने रसिकांची मने जिंकली. अमेय बिच्चू हे तन्मय देवचके, तालयोगी पंडित सुरेश तळवलकर, आणि विदुषी पद्मा तळवलकर यांचे शिष्य आहेत. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात केदार केळकर यांनी शास्त्रीय गायनाचे सादरीकरण केले. बागेश्री अंगाचा चंद्रकंस आणि शहाणा कानडा या रागांनी केदार यांनी मैफिलीला उंची दिली.

पंडित सुहास व्यास यांचे शिष्य असलेल्या केदार यांना संवादिनीवर अमेय बिच्चू यांनी साथ केली. या मैफिलीला तबल्याची साथ तन्मय बिच्चू यांनी केली.

# सावित्रीबाई फुले व ज्योतिबा फुले यांना भारतरत्न द्या - परशुराम वाडेकर

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त अभिवादन





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील पहिल्या महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या 193 व्या जयंती निमित्त यांच्या जयंतीनिमित्त बोपोडी चौक येथे सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस माजी उपमहापौर सुनिता परशुराम वाडेकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी आरपीयआयचे राज्य संघटन सचिव परशुराम वाडेकर यांच्यासह आरपीयआयचे कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी बोलताना परशुराम वाडेकर म्हणाले, सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांनी पहिली मुलींची शाळा भिडे वाडा येथे काढली. या शाळेच्या स्मारकासाठी रिपब्लिकन पक्षाने पहिले आंदोलन पुकारले. आंबेडकरी चळवळीच्या वतीने अनेक आंदोलने करण्यात आली. यानंतर अनेक पक्ष, संघटना सहभागी झाल्या. पण सुरुवात रिपब्लिकन पक्षाने केली या संदर्भात आम्ही कोर्टात सुद्धा गेलो. आज येथे स्मारक होत आहे; यामध्ये आंबेडकरी चळवळीचा मोठा वाटा आहे त्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांनी या देशांमध्ये गोरगरीब जनतेसाठी प्रचंड मोठे काम केले आहे. त्यांनी शोषित पीडित व स्त्रिमुक्तिच्या लढ्यासाठी व कल्याणासाठी स्त्रियांना सन्मान देऊन त्यांना सन्मानाने उभे करण्यामध्ये फुले दापत्यांचा खूप मोठा वाटा आहे. अशा महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांना भारत सरकारने भारतरत्न किताबाने सन्मानित करावे, ही मागणी गेल्या अनेक वर्षा पासून रिपब्लिकन पक्ष आंबेडकरी चळवळ समाज करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आमची विनंती आहे की महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांना भारतरत्नाने सन्मानित करावे. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सह्यांचे पत्र देखील पाठवण्यात येईल, असे ही परशुराम वाडेकर यांनी सांगितले.

# साहेबराव बुट्टेपाटील यांचे जीवन समाजासाठी समर्पित - ॲड. सर्जेराव पानसरे

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

साहेबराव बुट्टेपाटील आमदार असताना त्यांनी शेतकऱ्यांसाठी चासकमान धरण आणि विद्यार्थ्यांसाठी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या रूपाने शाश्वत विकासाचा पाया भक्कम केला. त्यांचे संपूर्ण जीवन समाजासाठी समर्पित होते अशी भावना ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सर्जेराव पानसरे यांनी व्यक्त केली.

साहेबराव बुट्टेपाटील यांच्या 24 व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी आमदार बाबाजी काळे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, राष्ट्रवादीच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, डॉ. प्रकाश चौधरी, प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, डॉ.एच.एम.जरे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

ॲड. पानसरे यांनी बोलताना साहेबराव बुट्टेपाटील यांच्या जीवन कर्तृत्वाला उजाळा दिला. त्यांचे व्यक्तिमत्त्व स्वच्छ, प्रामाणिक, चारित्र्यसंपन्न होते. त्यांना वक्तृत्वाची देणगी लाभलेली होती त्यामुळे समाज त्यांच्याशी जोडला गेला होता असे ते म्हणाले. चासकमान धरणाच्या भूमिपूजनप्रसंगी धरणग्रस्तांची बाजू मांडताना त्यांनी खणाला खण आणि फणाला फण मिळाला पाहिजे अशी आग्रहाची भूमिका मांडली. त्यांनी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या रूपाने ज्ञानमंदिर उभे केले, ज्याचा लाभ तालुक्यातील डोंगरी आदिवासी भागातील हजारो विद्यार्थ्यांना झाला. साहेबराव बुट्टेपाटील यांनी शेती आणि शिक्षणाचे जे काम उभे केले त्यातून ते कायम आपल्याबरोबर राहतील असा विश्वास ॲड. पानसरे यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी काजल वाळुंज, दिव्या पिंगळे या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. स्मृतिदिनानिमित्त क्रीडाज्योत, एनसीपी पथकाकडून मानवंदना, सर्वधर्मीय प्रार्थना, विज्ञान प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन, सरस्वतीपुत्र या भीत्तिपत्रकाचे अनावरण, आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात 78 रक्तदात्यांनी रक्तदान केले. पुण्याच्या ससून रक्तपेढीचे समाजसेवा अधीक्षक अरूण बर्डे, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. सुरेश सावंत, ममता राठोड सहभागी झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी केले.





# राजगुरु महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम

## सामाजिक प्रबोधनासाठी वाचनसंस्कृती आवश्यक - डॉ. संजय शिंदे

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

वाचनसंस्कृतीच्या विकासाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे भरणपोषण होण्यास तसेच सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते. म्हणून विद्यार्थ्यांनी अधिकाधिक अवांतर वाचनातून वाचनसंस्कृती विकसित करावी व नवीन वर्षात वाचन संकल्प करावा. असे आवाहन उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केले. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या माध्यमातून हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी व ग्रंथालय विभागाच्या वतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत सामूहिक वाचन व एकदिवसीय वाचन कौशल्य कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. राजेंद्र शिरसी, डॉ. बाळासाहेब अनुसे, ग्रंथपाल प्रा. पूनम तापकीर, प्रा. रौनक भिसे उपस्थित होत्या. डॉ. संजय शिंदे म्हणाले की, वाचन हे सर्वांसाठी अतिशय आवश्यक असे कौशल्य आहे. वाचन कौशल्य संपादित केल्यास कमी वेळात अतिशय प्रभावी अभ्यास करता येतो. योग्य मार्गाने सतत सराव केल्यास कार्यक्षम वाचक होऊ शकतो. या कार्यशाळेत डॉ. शिंदे यांनी वाचन कौशल्यासंदर्भातील मूलभूत संकल्पना विद्यार्थ्यांना सांगितल्या.सामूहिक वाचन या उपक्रमात विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीनुसार पुस्तके वाचण्याचा सामूहिक उपक्रम राबविण्यात आला. मराठी व ग्रंथालय विभागाच्या वतीने 1 ते 15 जानेवारी दरम्यान वाचन पंधरवडा उपक्रम राबविण्यात येणार असून पुस्तक प्रदर्शन, वाचन संवाद व पुस्तक परीक्षण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रौनक भिसे यांनी तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

